<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१</u>

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की,**

<u>सं.फौ.ख.क्र.११११/२०१९</u>
**निलेश विरूध्द गेंदूराम**
**निशाणी – ५ च्या पुढे**

**पुढील उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पुडके यांच्या मार्फत सुरू**

२१. मला आता निशाणी ३७/१ व ३७/२ कडील सन २०१९–२० व २०२०–२१ कडील आयकर परताव्याच्या प्रती दाखविल्या. मी आरोपीला पैसे दिल्याची नोंद या आयकर परताव्यामध्ये आहे का याची मला माहिती नाही. साक्षीदार सांगतो की आरोपीला पैसे दिल्याबाबत माझ्या सी.ए. ला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला कोणत्याची प्रकारचे हातउसने पैसे दिले नसल्याने त्याची आयकर परताव्यामध्ये नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की निशाणी २५ कडील धनादेश आरोपीच्या खात्यावरील नाही. हे म्हणणे खरे नाही की निशाणी २५ कडील धनादेशावर आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्याकडून हातउसने पैसे घेतले नसल्याने मला कोणताही धनादेश दिला नाही. आरोपीने मला करार करण्यासाठी स्टॅम्प पेपर घेण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्याकडे असलेल्या स्टॅम्प पेपरचा वापर करून मी माझ्या मनाने करार तयार केला. हे म्हणणे खरे नाही की मी स्वत: आरोपीची व माझी सही त्यावर केली व खोटे करारपत्र तयार केले. मी आरोपीला पैसे मागण्यासाठी नोटीस पाठविली होती. मी प्रकरणात नोटीस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्याकडून हातउसने पैसे घेतले नसल्याने मी त्याला रक्कम मागण्याची नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की शिक्षक सहकारी बँक मध्ये आरोपीचे खाते नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की धनादेश परत आल्यानंतर पाठविलेली नोटीस आरोपीला मिळालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मला कधीही धनादेश दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला फसविण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.02.21 17:23:55 +0530

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

कामठी
दिनांक २१/०२/२०२६